स्वाभिमानी,
आनंदी, परिपूर्ण
जीवनाचा करू
स्वीकार; बेरोजगारी,
गुन्हेगारी, भ्रष्टाचार,
दहशतवादाला
देऊ नकार

पुणे, वर्ष १, अंक ११ सप्टेंबर २०११ ₹ ३०

# अर्थपूर्ण

व्यक्ती, समाज आणि देशाच्या परिपूर्ण विकासासाठी...



# अण्णा, अर्थक्रांती करण्यात...

**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

भ्रष्ट आचाराने आपल्या आयुष्याला कसे व्यापून टाकले आहे, आणि ते आता लाखो माणसांच्या लक्षात यायला लागले आहे, हे अण्णांच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरलेल्या भारतीयांनी दाखवून दिले आहे. आम्हाला भ्रष्टाचारापासून मुक्ती हवी आहे आणि प्रामाणिक, समृद्ध आणि शांत जीवन जगायचे आहे, हे केवळ भारतीयच नव्हे, तर या जगातल्या प्रत्येक नागरिकाला वाटते. मात्र काही माणसांनी अक्कलहुशारीच्या आणि भांडवलाच्या जोरावर सापळाच असा रचला आहे, की काही मोजक्या माणसांच्या ताटात आपोआप भरपूर वाढले जाते आहे. काही जण ते ओढून घेण्यासाठी धडपडत आहेत. काही जण ताटात पडले तेवढ्यावर समाधान मानत आहेत तर काही जणांचे ताट अजूनही रिकामेच आहे. म्हणजे माणसांनी जे भोग भोगावेत त्यापेक्षा कितीतरी अधिक भोग घेणारी, अंथरूण पाहून पाय पसरावेत अशा मध्यममार्गात समाधान मानणारी आणि माणसाच्या वाट्याला यावीत, अशीच दुःख द्या, अशी याचना करणारी मंडळी अशा तीन प्रकारची माणसे या जगात कित्येक शतकांपासून आहेत. एकविसाव्या शतकात मात्र त्यात एक महत्त्वाचा बदल झाला आहे, तो असा की आपल्याला मिळणारी सुखदुःखे ही पूर्वजन्मातच निश्चित झाली आहेत, असे मानायला आता माणसे नकार देत आहेत. आता त्यांना कळाले आहे, की आपली सुखदुःखे जशी स्वतःवर अवलंबून आहेत, तेवढीच ती परस्परांवर अवलंबून आहेत. म्हणजे आपल्या सुखदुःखाचा आणि राजा, सरकार, प्रशासन यांचा जवळचा संबंध आहे. तो संबंध आता खऱ्या अर्थाने प्रस्थापित झाला आहे. जागतिकीकरणाने त्याला असा जोराचा धक्का दिला की केवळ 'ग्लोबल वॉर्मिंग' म्हणजे नैसर्गिकच नव्हे तर जगातील भौतिक व्यवहारही आपल्या आयुष्याला भिडायला लागले आहेत. हे याच वर्तमानात घडते आहे असे नाही, मात्र त्याचे भान आता बहुजनांना यायला लागले आहे. जगभर आज जी अस्वस्थता निर्माण झाल्यासारखे वाटते आहे, त्याचे खरे कारण हेच आहे.

'जगा आणि जगू द्या' असा संदेश देणारी भारतीय संस्कृती एक श्रेष्ठ संस्कृती आहे, याविषयी दुमत नसले तरी जगात जे नको ते घडते आहे, तेच आज भारतातही घडते आहे. या जागतिक वादळांमध्येच श्रेष्ठत्वाच्या कसोटीत आपण पास व्हायला हवे होते, मात्र तसे काही झालेले दिसत नाही. ज्या समूहाचे मानसिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय स्थैर्य धोक्यात सापडले आहे, तो समूह स्वतंत्रपणे जगू शकत नाही, हे तर आता सिद्धच झाले आहे. त्याला नाव काहीही दिले तरी ज्या आर्थिक व्यवहारांवर जग नाचायला लागले आहे, त्याच नाचात आज भारतीयही सहभागी झालेले दिसत आहेत. एकाप्रकारे या लाटेत सर्वच देशांनी आपले वेगळेपणाचे स्वातंत्र्य गमावले आहे. आता तुमचा धर्म, जात, देश, राज्य, भाषा, रूप, रंग महत्त्वाचा ठरत नसून तुमची आर्थिक पत महत्त्वाची ठरू लागली आहे. देशादेशाचे संबंध ही तर लांबची बाब झाली, ज्या नात्यांना आम्ही पैशात मोजायचे टाळत होतो, ती नातीही आता आर्थिक निकषांवर




ठरू लागली आहेत. गेल्या शतकातील मानसिकतेतूनच विचार केला तर 'सबसे बडा रुपैया', ही वाईट गोष्ट आहे. मात्र हा विचार सर्वव्यापी होतो, तेव्हा त्याविषयी तक्रार करायला जागाच राहत नाही. तशी आज तक्रारीला जागा राहिलेली नाही. प्रत्येकाची आर्थिक पत वाढविणे हाच परिवर्तनाचा खरा मार्ग आहे, यावर तर महंमद युनुसांना नोबेल पुरस्कार देऊन जगाने शिक्कामोर्तबच केले आहे.

जगाचा हा प्रवास असे सांगतो की आता जगाच्या हिताचे आर्थिक व्यवस्थापन करावे लागेल. मानवी उन्नतीसाठी 'आपलाच मार्ग खरा' असे सांगणारे 'इझम्स'ची मुदत संपूनही आता किमान तीन दशके ओलांडून गेली आहेत. अख्खे जग आता नवी व्यवस्था मागू लागले आहे. अशी व्यवस्था जी अधिकाधिक माणसांना त्याची प्रतिष्ठा त्याचा मानवी हक्क म्हणून देणार आहे. अशी व्यवस्था ज्यात मुजोरी नसेल आणि मिंधेपणाही नसेल. अशी व्यवस्था जिला मूलभूत गरजा भागविताना माणसामाणसांमध्ये भेद करता येणार नाहीत. अशी व्यवस्था जी आधुनिक तंत्रज्ञानावर स्वार होऊन नकोशा मानवी हस्तक्षेपाला लगाम लावेल. अशी व्यवस्था जी मानवाचे निसर्गातील संवेदनशीलतेचे वेगळेपण पुन्हा बहाल करील. अशी व्यवस्था जी जगाला खऱ्या अर्थाने जवळ आणेल. अशी व्यवस्था जी माणसाला मानवी आयुष्य जगण्याची मुभा देईल.

अशाच व्यवस्थेसाठीचे एक ऑपरेशन अर्थक्रांती सुचविते. त्याचा स्वीकार आजच्या कॅन्सरग्रस्त जगाला आज ना उद्या करावाच लागणार आहे. भारतातील आणि जगभरातील उठाव असे सांगतात की ती वेळ दाराशी येऊन ठेपली आहे. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखालील उठाव महत्त्वाचा यासाठी आहे की तो जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाही देशातील आणि जगाच्या दुसऱ्या क्रमांकाच्या लोकसंख्येचा उठाव आहे. या उठावाची आजची मागणी जनलोकपालासारखी देखरेख वाढविणारी आणखी एक व्यवस्था हवी, अशी असली तरी उद्याची मागणी जीवन व्यापून टाकणाऱ्या अर्थव्यवस्थापनाचीच असली पाहिजे. ते व्यवस्थापन म्हणजे १२१ कोटी भारतीयांसाठीची 'अर्थक्रांती'.

सदोष करपद्धती, दुबळी बँकिंग व्यवस्था, अनिर्बंध रोखीचे व्यवहार, अपुरी भांडवल निर्मिती, विषमतेची खोल दरी, राजकारणात काळा पैसा वापरण्याची नामुष्की, काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था याचे ऑपरेशन केल्याशिवाय भ्रष्टाचाराला रोखता येणार नाही. व्यवस्थेत बदल झाला पाहिजे, असे सर्वच म्हणतात, मात्र काय बदल झाला पाहिजे, हे अर्थक्रांतीने सांगितले आहे. हे दोष काढून टाकण्याचे उपाय केले जात नाहीत, तोपर्यंत भ्रष्टाचार कमी झाला पाहिजे, असे बोलणे हा अप्रामाणिकपणाच होय.




# चलो दिल्ली

नमस्कार,

**अर्थक्रांती सरकारपर्यंत पोचविण्यासाठी १० हजार भारतीय नागरिकांसमावेत येत्या १५ ऑगस्टदरम्यान म्हणजे एका वर्षाने दिल्लीला जाण्याचे 'अर्थक्रांती प्रतिष्ठान'ने ठरविले आहे. अर्थक्रांतीच्या पाच प्रस्तावांवर सरकारने आयोग नेमावा आणि १२१ कोटी भारतीयांना प्रामाणिक, समृद्ध आणि शांत जीवन जगण्याचा मार्ग प्रशस्त करावा, अशी मागणी केंद्र सरकारकडे केली जाणार आहे. आर्थिक स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार करून तो सरकारला देण्यात येणार आहे. हे सरकार विरोधातील आंदोलन असणार नाही. आर्थिक साक्षरतेतून परिवर्तन करणारी ही चळवळ असेल. या उपक्रमात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी पुढील पत्यावर पोस्टकार्डाने आपली माहिती पाठवावी. या उपक्रमासंबंधीची माहिती 'अर्थपूर्ण' शिवाय अर्थक्रांतीच्या वेबसाईटवरही उपलब्ध असणार आहे.**

**अर्थपूर्ण पब्लिकेशन्स**

सी-६, हरिस्मृती, आयडीबीआय बँकेच्या मागे, मेहंदळे गॅरेज रस्ता, एरंडवणे, पुणे-४११००४. संपर्क - ०२०-३२६००९९६

editor.arthapurna@gmail.com

## आर्थिक स्वातंत्र्याचा जाहीरनामा घेऊन १० हजार नागरिक पुढील वर्षी १५ ऑगस्ट २०१२ (बुधवार)ला दिल्लीत पंतप्रधानांना भेटणार आहेत. आपणही त्यात सहभागी व्हा.

**या मोहिमेत आपण असे सहभागी होऊ शकता**

१.'चलो दिल्ली' मोहिमेच्या आपले कौशल्य कर्तव्य म्हणून देऊन.

२.अर्थक्रांतीच्या प्रस्तावांचा मित्रांमध्ये प्रसार करून.

३.'चलो दिल्ली' मोहिमेसाठी वर्षभर चालणाऱ्या उपक्रमांत सहभागी होऊन.

४.'चलो दिल्ली' मोहिमेसाठी शक्य असेल तो निधी देऊन.